आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२३ एप्रिल २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत मंत्रीमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीची बैठक सुरू

- पहलगाम हल्ल्यातल्या गुन्हेगारांना लवकरच सडेतोड प्रत्युत्तर दिले जाईल, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचं प्रतिपादन

- पहलगाममधल्या दहशतवादी हल्ल्याचा जगभरातून निषेध

- चार महिन्यांनंतर सेन्सेक्स पुन्हा ८० हजाराच्या वर, सोनं अडीच हजार रुपयांनी स्वस्त

**आणि**

- अमेरिकेनं लादलेल्या अतिरीक्त आयात शुल्कामुळं जागतिक विकास दरात घट होण्याचा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा अंदाज

**<><><><><>**

पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नवी दिल्लीतल्या निवासस्थानी मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीची बैठक सुरू आहे. या बैठकीत गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित आहेत.

**<><><><><>**

पहलगाम हल्ल्यातील गुन्हेगारांना लवकरच सडेतोड प्रत्युत्तर दिले जाईल, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. राजनाथ सिंह यांनी आज नवी दिल्ली इथं आयोजित हवाई दल मार्शल अर्जन सिंह स्मृती व्याख्यान कार्यक्रमात

व्याख्यान दिलं. त्यावेळी ते बोलत होते. दहशतवादाविरुद्ध शून्य सहिष्णुता हेच भारताचं धोरण आहे, पहलगाम हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांना प्रत्युत्तर देताना सरकार कोणतीही कसर सोडणार नाही, असं ते म्हणाले. यावेळी राजनाथ सिंह यांनी या हल्ल्याचा निषेध करत पिडित कुटुंबांप्रति सहवेदनाही व्यक्त केल्या.

**<><><><><>**

या दहशतवादी हल्ल्यात राज्यातल्या एकूण ६ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. त्यातले डोंबिवलीचे संजय लेले, हेमंत जोशी आणि पनवेलचे दिलीप डिसले यांचं पार्थिव मुंबईत पोहोचलं आहे. कौस्तुभ गणवते आणि संतोष जगदाळे यांचं पार्थिव थोड्याच वेळात पुण्यात पोहोचेल.

मृतांच्या कुटुंबांना राज्यशासनानं प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. काश्मीरमधे अडकलेल्या पर्यटकांना सुखरुप राज्यात परत आणण्याला शासनाचं प्राधान्य राहील असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं.

**होल्ड- बाईट- फडनवीस**

जम्मू काश्मीर सरकारनं मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी १० लाख रुपये आणि गंभीररित्या जखमी झालेल्यांना प्रत्येकी २ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे.

या हल्ल्यात जखमी झालेले राज्यातले चार पर्यटक सुखरूप असून, त्यांच्याशी संपर्क साधण्यात आला असल्याचं दिल्लीच्या महाराष्ट्र परिचय केंद्राने कळवलं आहे. तसंच, जम्मू-कश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या राज्यातल्या इतर पर्यटकांची माहिती गोळा करण्याचं काम सुरू आहे. आतापर्यंत ३०८ पर्यटकांशी संपर्क साधला गेला आहे. या पर्यटकांना राज्यात परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी विशेष विमानांची सोय केली जाईल, असं नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितलं. श्रीनगरहून मुंबईला उद्या दोन विमानं

येणार असून यात १८२ पर्यटक येणार आहेत. यासाठी इंडिगो आणि एअर इंडियाच्या विमानांची व्यवस्था झाली असून याचा खर्च राज्य सरकार करणार असल्याचं मोहोळ यांनी सांगितलं.

पर्यटकांच्या मदतीसाठी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन श्रीनगरमध्ये आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही आज श्रीनगरला रवाना झाले.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या सोयीसाठी भारतीय रेल्वे कटरा ते दिल्ली विशेष गाडी आज रात्री सोडणार आहे. प्रवाशांच्या मदतीसाठी रेल्वेने विशेष हेल्पलाईन क्रमांक जम्मू - तावी, श्री माता वैष्णोदेवी कटरा आणि उधमपूर या स्थानकांसाठी उपलब्ध करुन दिले आहेत.

श्रीनगर हून दिल्ली आणि मुंबई करता मिळून ४ विशेष विमानं सोडण्यात आली, आणि प्रवाशांच्या मागणीनुसार आणखी विमानसेवा उपलब्ध करुन दिल्या जातील असं नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी सांगितलं आहे.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा जगभरातील नेत्यांनी तीव्र निषेध नोंदवला असून, भारताला पाठिंबा दर्शवला आहे. अनेक प्रमुख नेत्यांनी दूरध्वनीद्वारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा केली आणि आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्या, तसंच दहशतवादाविरोधातल्या लढ्यात भारतासोबत असल्याची ग्वाही दिली.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, मॉरिशसचे प्रधानमंत्री डॉ. नवीन रामगुलाम आणि नेपाळचे प्रधानमंत्री के.पी. शर्मा ओली यांनी दूरध्वनीद्वारे प्रधानमंत्र्यांशी चर्चा करून हल्ल्याचा निषेध केला आणि मृतांबद्दल शोक व्यक्त केला. या हल्ल्यात एका नेपाळी नागरिकाचा मृत्यू झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी के.पी. शर्मा यांच्याकडे शोक व्यक्त केला, तसंच या हल्ल्यातल्या

पिडितांना न्याय मिळवून देण्यासाठी वचनबद्धताही व्यक्त केली. भारत दौऱ्यावर असलेले अमेरिकेचे उपाध्यक्ष जे डी. व्हान्स यांनीही या हल्ल्याचा निषेध केला. भारताला आवश्यक असलेली सर्व मदत अमेरिका करेल, असं आश्वासन त्यांनी दिलं.

याव्यतिरिक्त, ब्रिटनचे प्रधानमंत्री केअर स्टार्मर यांनी या हल्ल्याला विनाशकारी म्हटलं आहे, तर जर्मनीचे चान्सलर ओलाफ शोल्झ यांनी या हल्ल्यातले जखमी लवकर बरे व्हावेत अशी प्रार्थना केली आहे. डेन्मार्कच्या प्रधानमंत्री मेटे फ्रेडरिकसेन, इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी आणि युरोपीय आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन, फ्रान्सचे प्रधानमंत्री इमॅन्यएल मॅक्रॉन यांनीही भारतासोबत खंबीरपणे उभं राहण्याचा निर्धार व्यक्त केला. गयानाचे राष्ट्राध्यक्ष इरफान अली यांनी या हल्ल्याला घृणास्पद कृत्य म्हटलं आहे, तर ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांनी दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारताला पाठिंबा दर्शवला आहे. न्यूझीलंडच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी तसंच युक्रेनच्या भारतातल्या  दूतावासानंही या हल्ल्याचा निषेध करत चिंता व्यक्त केली आहे.

बांग्लादेशाच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार प्राध्यापक महोम्मद युनुस तसंच बांग्लादेशाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानंही या हल्ल्याचा निषेध केला आहे.

**<><><><><>**

पहेलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी अखिल भारतीय सुन्नी जमियत उलेमा आणि रझा अकादमीनं केली आहे.  जुहरच्या नमाजानंतर मुंबई सेंट्रल इथं सुन्नी बिलाल मशिदीत झालेल्या निषेध आंदोलनात दहशतवादाविरुद्ध तीव्र संताप मुस्लिम बांधवांनी व्यक्त केला. त्यावेळी ही मागणी करण्यात आली. या हल्लेखोरांना लवकरात लवकर शिक्षा व्हावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आला.

<><><><><>

जम्मू काश्मीरमधल्या कुलगाममधे दहशतवादी आणि सुरक्षा दलाचे जवान यांच्यात चकमक सुरू आहे. कुलगाममधल्या तंगमार्ग परिसरात दहशतवादी असल्याची माहिती मिळताच सुरक्षा दल त्याठिकाणी पोहोचले आणि जवानांनी दहशतवाद्यांना चोहोबाजूंनी घेरल्याचं वृत्त आहे. या परिसरात दोन ते तीन दहशतवादी लपल्याचं सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पंजाब राज्याने आपली पाकिस्तानच्या बाजूची सीमा बंद केली असून राज्यात रेड अलर्ट जारी केला आहे. पंजाबमधल्या पर्यटन स्थळावरची सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. मुख्यमंत्री भगवंत मान यांनी आज प्रशासकीय आणि पोलीस अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय बैठक घेतली. राज्याच्या सीमा पाकिस्तानला आणि काश्मीरला लागून असल्यामुळे राज्यात कडक सुरक्षा व्यवस्था ठेवल्याचं मुख्यमंत्र्यांनी वार्ताहरांना सांगितलं. तसंच पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला.

<><><><><>

खरेदी वर्ष २०२४-२५ साठी राज्यात शेतकऱ्यांनी पिकवलेली सगळी तूर किमान आधारभूत दरानं खरेदी करायला केंद्रसरकारनं मान्यता दिली आहे. महाराष्ट्राबरोबरच आंध्र प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हरयाणा, कर्नाटक, मध्य प्रदेश, तेलंगण आणि उत्तर प्रदेश या राज्यांमधली एकूण १३ लाख २२ हजार टन तूर याअंतर्गत खरेदी केली जाणार आहे.

आयातीवरचं अवलंबित्व कमी करण्यासाठी देशांतर्गत डाळींचं उत्पादन वाढवण्यात योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेतला असल्याचं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक, आणि तेलंगणात नाफेड आणि NCCF, अर्थात राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघामार्फत किमान आधारभूत दरानं खरेदी सुरु असून कालपर्यंत ३ लाख ९२ हजार टन तुरीची खरेदी झाली आहे.

<><><><><>

राज्यात राबवण्यात आलेल्या पोषण पंधरवड्यात नांदेड जिल्ह्यातल्या ७२३ अंगणवाड्यात १ लाख ५४ हजार २३७ उपक्रम राबवण्यात आले. कुपोषणाचं प्रमाण कमी करण्यासाठीही योग्य आहाराबाबत माहिती देण्यात आल्याचं नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी सांगितलं..

**होल्ड - बाईट मेघना कावली( १२ सेकंद)**

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर ५२१ अंकांची वाढ झाली, आणि तो ८० हजार ११६ अंकांवर बंद झाला. सुमारे ४ महिन्यानंतर हा निर्देशांक पुन्हा ८० हजारांच्या पलीकडे गेला आहे. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १६२ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ३२९ अंकांवर बंद झाला.

सोनं आज तोळ्यामागे अडीच हजार रुपयांनी स्वस्त झालं. मुंबईत आज २४ कॅरेट सोन्याचे दर सुमारे ९९ हजार रुपये तोळा झाले होते. तर २२ कॅरेट सोनं ९६ हजार ६०० रुपयांच्या आसपास मिळत होत. चांदी आज किलोमागे १ हजार रुपयांनी महाग झाली आणि ९९ हजार ५०० रुपयांच्या पुढे चांदीचा दर पोहोचला.

<><><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जवळपास आपल्या सर्व व्यापारी भागीदार देशांवर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लावल्यानंतर, सुरू झालेल्या व्यापार युद्धाच्या पार्श्वभूमीवर, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं जागतिक विकास दरात सार्वत्रिक घट होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

या ताज्या अहवालानुसार जानेवारी मध्ये वर्तवलेल्या अंदाजित आकडेवारीच्या तुलनेत २०२५ या वर्षात जागतिक उत्पादन २ पूर्णांक ८ दशांश टक्क्यापेक्षा कमी दरानं वाढेल असा अंदाज आहे, तर २०२६ मध्ये ही वाढ ३ टक्के इतकी असू शकेल असं नाणेनिधीनं म्हटलं आहे. या वर्षी जानेवारी महिन्यात व्यक्त केलेल्या अंदाजाच्या तुलनेत हा दर १ दशांश टक्क्यानं कमी आहे.

<><><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबाद इथं सनरायझर्स हैदराबाद आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना सुरु आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा सनरायझर्स हैदराबादच्या ९ व्या षटकात ५ बाद ३५ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//